प्रबोधन
गोरेगाव

# दहावा वार्षिक अहवाल

## १९८१-८२

# प्रबोधन, गोरेगाव

## १० वी वार्षिक सर्वसाधारण सभा

**प्रबोधन, गोरेगाव** या संस्थेची १० वी वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार दिनांक ५ मार्च १९८३** रोजी रात्रौ ९ वा. 'विद्युत' महात्मा गांधी मार्ग, गोरेगाव (पश्चिम), मुंबई-६२ येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

**सभेपुढील कामकाज :**

१. प्रास्ताविक

२. सन १९८१-८२ चा वार्षिक अहवाल, आयव्यय पत्रक व ताळेबंद (हिशेब तपासनीसाच्या अहवालासह) वाचून मंजूर करणे.

३. नवीन वर्षाकरिता (१९८२-८३) घटनेच्या कलम ७(ई) प्रमाणे अध्यक्ष (१ जागा) उपाध्यक्ष (२ जागा) व कार्यकारी मंडळावरील निवृत्त झालेल्या ३ सभासदांच्या जागी नवीन सभासदांची निवड करणे (एकूण ६ जागा)

४. नवीन वर्षाकरिता अंतर्गत हिशेब तपासनीस व सरकारमान्य हिशेब तपासनीस यांची नेमणूक करणे.

५. अध्यक्षांचे अनुमतीने सभेपुढे येणारी कामे.

कार्यकारी मंडळाच्या आज्ञेवरून
**विजय नाडकर्णी**
कार्याध्यक्ष

गोरेगाव, मुंबई-६२
दिनांक १० फेब्रुवारि १९८३

**विलास देवरुखकर**
प्रमुख कार्यवाह

---

**विशेष सूचना :** १] संस्थेचा जमाखर्च सभासदांच्या अवलोकनार्थ 'विद्युत' लो. टिळक नगर रस्ता क्र. ४, गोरेगाव (प.) येथील संस्थेच्या कार्यालयात दि. १-३-१९८३ ते ३-३-१९८३ पर्यंत रोज रात्रौ ८ ते ९ पर्यंत ठेवण्यात येईल

२] कोणाहि सभासदास त्या बाबतीत काही सूचना करावयाच्या असल्यास त्या लेखी दिनांक ४-३-१९८३ पूर्वी कार्याध्यक्षांकडे सादर कराव्यात.

३] गणसंख्येच्या अभावी वरील सभा तहकूब झाल्यास, तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहाणार नाही.

४] निवडणूकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदांनी आपले अर्ज दि. ३-३-१९८३ पूर्वी 'विद्युत' लो. टिळक नगर रस्ता क्र. ४, गोरेगाव (प), येथे रात्रौ ८ ते ९ या वेळेत आणून द्यावेत. अर्जाचा नमुना याच ठिकाणी उपलब्ध आहे.

# 'प्रबोधन' गोरेगाव

## १० वा वार्षिक अहवाल
## १९८१–१९८२

**प्रबोधन गोरेगाव** संस्थेच्या कार्याचा दि. १ जुलै १९८१ ते ३० जून १९८२ या दहाव्या वर्षाचा अहवाल आणि हिशेब पत्रके सादर करताना कार्यकारी मंडळास अतिशय आनंद होत आहे.

### कार्यकारी मंडळ आणि सभा

अहवाल वर्षात कार्यकारी मंडळाच्या एकूण १० सभा घेण्यात आल्या. सभांना सरासरी १० सदस्य उपस्थित होते.

### उपक्रम आणि कार्यक्रम

संस्थेने या वर्षी दहाव्या वर्षात पदार्पण केले असल्यामुळे सभासदांना उत्तमोत्तम कार्यक्रम पहाता यावेत यासाठी कार्यकारी मंडळाने विशेष मेहनत घेतली होती. गेल्या ९ वर्षांचा अनुभव पाठीशी असल्यामुळे रचनात्मक कार्यक्रमाच्या जोडीनेच करमणूक प्रधान कार्यक्रम आयोजित करण्यात आले. मात्र विधायक भरीव कार्याला प्राधान्य देण्याची परंपरा कसोशीने पाळण्यात आली.

### प्रबोधन वक्तृत्व स्पर्धा ( वर्ष ९ वे )

' प्रबोधन ' ने १९७३ साली सुरु केलेल्या शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व स्पर्धेला आज महाराष्ट्रात प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त झाले आहे. या राज्य पातळीवरील स्पर्धेत स्पर्धक मोठ्या तयारीने भाग घेऊन ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी झटत असतात. या चढाओढीच्या काळात वक्तृत्व कला अंगी असणे हे मोठे वरदानच. म्हणूनच ही वक्तृत्व कला जोपासण्या-साठी प्रबोधनने संस्थेच्या स्थापनेपासून या स्पर्धेचे आयोजन करण्यात कोणत्याही प्रकारची ढिलाई अद्यापपर्यंत येऊ दिलेली नाही. दि. ४ ऑक्टोबर १९८१ रोजी पाटकर महाविद्यालयातील सभागृहात विद्यार्थी, पालक, शिक्षक व अन्य रसिकांच्या भरगच्च उपस्थितीत या स्पर्धा मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या. शालेय गटाची सांघिक विजयाची **कै. कृष्णाजी गोविंद सैतवडेकर स्मृती प्रबोधन फिरती ढाल "** मुलुंडच्या वामनराव मुरांजन माध्य. विद्यालयाने पटकावली तर महाविद्यालयीन गटात हाच बहुमान राम नारायण रुईया महाविद्यालयाने संपादन करुन **"कै. तरुलता-बाई गुप्ते स्मृती प्रबोधन फिरती ढाल** मिळविली स्पर्धेचे परीक्षण सौ. वैशाली वैद्य, श्रीमती वाळिंबे, प्रा. दिगंबर पाध्ये व प्रा. तेंडुलकर यांनी केले.

### एकांकिका स्पर्धा ( वर्ष १० वे )

हौशी नाट्य संस्थांच्या वर्तुळात " प्रबोधन " एकांकिका स्पर्धेला एक कौतुकाचे तसेच मानाचे स्थान आहे. मुंबई प्रमाणेच इतरही शहरांतील असंख्य नाट्य-संस्था या स्पर्धेत भाग घेण्यासाठी सदैव प्रयत्नशील असतात. मात्र आर्थिक व वेळेच्या मर्यादेमुळे तसेच सुसज्ज नाट्यगृहाच्या अभावी संस्थेला सर्वच इच्छुक संस्थांना स्पर्धेत प्रवेश देता येत नाही. या वर्षीही संस्थेकडे आलेल्या अनेक अर्जातून १८ एकांकिकांची निवड करण्यांत आली. त्यांतून **प्रयोग, मालाड** या संस्थेच्या **बेरीज वजाबाकी** या एकांकिकेस कै. केशवराव दाते चषक व रोख रु. ५००/– देऊन सर्वोत्कृष्ट प्रयोगाबद्दल गौरविण्यात आले. स्पर्धेचे परीक्षण सौ. मीना नाईक,

श्री. विनय आपटे व श्री. मंगेश कुलकर्णी यांनी केले. श्री. सतीश प्रधान, माजी नगराध्यक्ष, ठाणे नगरपालिका यांनी विजेत्यांना पारितोषिके प्रदान करुन नाट्यकला–कारांचा गौरव गेला.

## बालचित्रपट महोत्सव

बालचित्रपट समिती, भारत व बालचित्र गोरेगाव यांच्या विद्यमाने दि. १९ ऑक्टोबर १९८१ ते १० जाने. १९८२ या कालावधीत टोपीवाला चित्रपटगृहात बाल–गोपाळांसाठी बालचित्रपट महोत्सव आयोजित करुन गोरेगावकरांकडून शाबासकी मिळवली. गोरेगावातील विद्यार्थ्यांनी या चित्रपटांचे मोठ्या हर्षभराने स्वागत करुन चित्रपट महोत्सव यशस्वी करण्यास हातभार लावला. चित्रपट महर्षी **श्री. पद्मश्री व्ही. शांताराम** हे सांगता समारंभास आस्थेने उपस्थित राहिले व त्यांनी संस्थेच्या कार्याचा उचित गौरव केला.

## एस. एस. सी. व्याख्यानमाला (वर्ष १० वे)

एस. एस. सी. च्या विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणा-प्रमाणेच अन्य अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन उपलब्ध करुन देणारी ही व्याख्यानमाला म्हणजे गोरेगावच्या परिसरातील विद्यार्थ्यांना एक सहाय्यकर्ती योजनाच होय. शीस्तपूर्ण वातावरणात पार पडणारी ही व्याख्यानमाला यशस्वी करण्यासाठी नामवंत शिक्षक श्री. एस. वाय. गोडबोले व त्यांचे सहकारी यांनी संस्थेला नेहमीच हातभार लावला आहे. दि. १९ फेब्रुवारी ते २६ फेब्रु. १९८२ पर्यंत चाललेल्या या ज्ञानसत्राची उपयुक्तता एस. एस. सी. परीक्षेनंतर विद्यार्थी व पालक यांनी मुद्दाम येऊन व्यक्त केलेल्या आभारावरुनच सिद्ध झाली.

## दहावे वर्धापन दिन संम्मेलन

२६ मार्च १९८२ रोजी गुढीपाडव्याला संस्थेचा १० वा वर्धापन दिन आयोजित करण्यात आला होता. संस्थेच्या सभासदांसाठी ' नस्तं झेंगट ' हे विनोदी नाटक दिनानाथ नाट्यगृह विलेपार्ले येथे दाखविण्यात आले. मार्च १० वी एस. एस सी. परीक्षेत गोरेगावातील शाळां मधून सर्वप्रथम आलेल्या कु. अनुराधा श्रीधर देशपांडे हिस रु. ५१/– चे पारितोषिक देऊन त्या बहुमानाबद्दल सत्कार करण्यात आला. तसेच मराठी, इंग्रजी व गणित या विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या अनुक्रमे कु. श्रद्धा नाडकर्णी, कु. अनिल नाईक व कुमार पारीश खानोलकर यांना प्रत्येकी रु. ५१/– चे पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध चित्रपट अभिनेते श्री. अमोल पालेकर हे उपस्थित होते.

## राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा अभ्यास वर्ग

राष्ट्राच्या उन्नतीसाठी बुध्दिमान व्यक्तींची गरज असल्यामुळे नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग ( NCERT ) दिल्ली तर्फे प्रतिवर्षी घेतली जाणारी राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा ही बुध्दीमान विद्यार्थ्यांचा मागोवा घेण्याच्या दृष्टीने उपकारकच ठरली आहे. राष्ट्रीय पातळीवरील या स्पर्धा परीक्षेत मराठी मुलांचे प्रमाण वाढते रहावे या हेतूनेच प्रबोधनने हा अभ्यास वर्ग उपनगरांतील विशेषतः अंधेरी ते दहिसर परिसरांतील विद्यार्थ्यांच्या खास सोईसाठी दि. ९ एप्रिल १९८२ ते १४ एप्रिल १९८२ पर्यंत पाटकर महाविद्यालय गोरेगाव येथे आयोजित केला होता. या वर्गाचा लाभ ३८ विद्यार्थ्यांनी घेतला. प्रा. द. बि. बादवे यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली हा वर्ग चालविण्यात आला.

## मनोरंजन

संस्थेच्या सभासदांना ' पंखाना ओढ पावलांची' व 'देणाऱ्याचे हात हजार' ही लोकप्रिय नाटके दिनानाथ नाट्यगृह, विलेपार्ले येथे विनामूल्य दाखविण्यात आली.

## प्रबोधन बालवाचनालय

प्रबोधन बालवाचनाल्याच्या एकूण ५ शाखा–मधून जवळजवळ ८०० शालेय विद्यार्थी लाभ घेत आहेत. बालवाचकांसाठी विनामूल्य चालविण्यात येणाऱ्या

उपक्रमाचा उत्तरोत्तर विकास होत आहे ही समाधानाची बाब आहे. या सर्व शाखांमध्ये मिळून एकूण २००० पुस्तकांचा संग्रह आहे.

## प्रबोधन बालवाडी

सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करीत असताना समाजाच्या अविकसित घटकाला उपयुक्त ठरणारे उपक्रम आयोजित करण्याचे संस्थेचे धोरण आहेच. त्यानुसार जवाहर नगर (गोरेगाव पश्चिम) येथील झोपडपट्टी विभागातील बालवाडी शाखेच्या बरोबरच तीन डोंगरी गोरेगाव (प.) येथे देखील विनामूल्य बालवाडी चालविली जाते. या बालवाड्यांतील ६०–७० बालकांना पूर्व प्राथमिक स्वरुपाचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्यांत येते. गुढीपाडव्याला व स्वातंत्र्यदिनी बालकांना खाऊची भेट संस्था देते.

## प्रबोधन क्रीडा महोत्सव ( वर्ष ४ थे )

गेल्या तीन वर्षापासून संस्थेने एक महत्वाकांक्षी उपक्रम सुरु केला आहे. वांद्रे ते दहिसर या विभागातील माध्यमिक शाळांच्या विद्यार्थ्यांच्या विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करुन संस्थेने क्रीडा विश्वात पदार्पण केले. या चौथ्या वर्षी दि. १२ व १३ डिसेंबर ८१ या दोन दिवशी कबडडी, खो–खो, अॅथलेटीक्स व लोकनृत्य या विभागां–मध्ये १५०० हून अधिक विद्यार्थी–विद्यार्थीनींनी आपले क्रीडा नैपुण्य दाखविले. सिद्धार्थ नगरचे क्रीडांगण खास या स्पर्धेसाठी समतल करुन घेण्यात आले. भव्य करंडकां–बरोबरच विजेत्यांना पदके व प्रशस्तीपत्रके देण्यात आली. या महोत्सवासाठी विविध क्रीडा संघटनांनी व आदर्श विद्यालय या संस्थेने विशेष सहाय्य दिले. क्रीडा रसिकांच्या प्रचंड उपस्थितीमुळे या क्रीडा स्पर्धांना खरेखुरे महोत्सवी स्वरुप प्राप्त झाले.

या स्पर्धांचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष **श्री. भाई सावंत** यांच्या शुभहस्ते करण्यात आले व बक्षिस समारंभ क्रीडा महर्षी **श्री. यशवंतराव गोळे** यांच्या शुभहस्ते पार पाडण्यात आला.

## धन्यवाद

संस्थेने आजवर केलेल्या कार्यात असंख्य हित–चिंतकांचा, सभासदांचा व कार्यकर्त्यांचा सिंहाचा वाटा आहे. पत्रकार, अन्य संस्था यांच्या सक्रीय सहकार्यामुळेच हे कार्य शक्य झाले. संस्थेचे सरकारमान्य हिशेब तपासनीस मेसर्स एस. एस. नायक आणि कं. व अंतर्गत हिशेब तपासनीस श्री. रामचंद्र जोशी यांनी बहुमोल सहकार्य व मार्गदर्शन केले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने यावर्षी संस्थेला रु. १,००,००० चे अनुदान दिले. या बहुमोल उदार मदतीबद्दल संस्था महापालीकेची व अनुदान समिती वरील नगरसेवक सदस्यांची अत्यंत ऋणी आहे. अशा सर्व संबंधीतांचा हाच लोभ सदैव कायम राहील असा विश्वास व्यक्त करीत आहोत.

आपले नम्र,

**कार्यकारी मंडळ १९८१–८२**

**प्रबोधन गोरेगाव.**

# प्रबोधन, गोरेगाव

संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये नोंदलेली संस्था ( Regn. No. Bom 49/72 GB BSD )
मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदलेली संस्था (Regn. No. F 2502 Bom)

( १९८१–८२ )


अध्यक्ष : *श्री. निळकंठ ज. सावंत*

उपाध्यक्ष : *श्री. प्रभाकर ज. मोडक* डी.एम.अी, डी.अी.ओ.
*श्री. शरद गुप्ते* बी.ए.

कार्यकारी मंडळ

कार्याध्यक्ष : *श्री. विजय नाडकर्णी* बी. ई. [ऑ.] सिव्हील

प्रमुख कार्यवाह : ,, *विलास देवरुखकर* बी. एसूसी. [ऑ.]

सह कार्यवाह : *डॉ. मनोहर अदवानकर* एम. एसूसी., पी. एच्. डी.
*श्री. सुरेश चव्हाण* बी. ए.

कोषाध्यक्ष : ,, *महादेव खानोलकर*

—: सभासद :—

*श्री. पद्माकर देसाई* बी. एससी. [ऑ.]
,, *सुरेश सैतवडेकर*
,, *गणपतराव सारंग* जी. डी. आर्ट
,, *दिलीप साळवी* बी. एससी. [ऑ.]
,, *सुरेश माईणकर*
,, *वसंत तावडे* बी. ए.

*श्री. सुभाष देसाई*
,, *दिनकर मालवणकर*
,, *चंद्रकांत ज. सावंत*
,, *महादेव वीरकर*
,, *विकास रेळे* बी.ए., एल.एल.बी.

अंतर्गत हिशेब तपासनीस :
*श्री. रामचंद्र जोशी* बी. कॉम.

सनदी लेखापाल :
*मे. एस. एस. नायक आणि कं.*



*कार्यालय :*

'विद्युत' लोकमान्य टिळक नगर रस्ता क्र. ४,
महात्मा गांधी मार्ग, गोरेगाव (प.),
मुंबई–४०० ०६२

*संपर्क :*

रंगसेवा,
फिल्मिस्तान जवळ, स्वा. वि. मार्ग,
गोरेगाव (प.), मुंबई–४०० ०६२
दूरध्वनी ६९ ४१ ५७

<u>बुक-पोस्ट</u>

सभासद क्र.

द्वारा :-
**'प्रबोधन' गोरेगाव**
'विद्युत' लो. टिळक नगर रस्ता क्र. ४,
महात्मा गांधी मार्ग, गोरेगाव (पश्चिम),
मुंबई-४०० ०६२